# कॉक्सिटच्या विद्यार्थ्यांची टी.सी.एस. सॉफ्टवेअर कंपनीत निवड

लातूर (दि.२४) - येथील अंबेजोगाई रोडवरील संगणकशास्त्र व माहितीतंत्रज्ञान महाविद्यालयामधील (कॉक्सिट) तीन विद्यार्थ्यांची सॉफ्टवेअर कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर या पदी निवड झाली आहे. मराठवाड्यात कॉक्सिट हे संगणकशास्त्र व माहितीतंत्रज्ञान या क्षेत्रामध्ये सर्वात अग्रगण्य महाविद्यालय असून महाविद्यालयाने अनेक विद्यार्थ्यांना थेट कॅम्पस मुलाखतीत सॉफ्टवेअर कंपनीत नोक-या मिळवून दिल्या आहेत. या शैक्षणीक परंपरेला अनुसरून टीसीएस मध्ये प्रमोद पाटील ( बीएस्सी एसई), कैलास झुंजारे ( बीएस्सी सीएस ), फरीन शेख (बीएस्सी सीएस) या तीन विद्यार्थ्यांची टीसीएस या सॉफ्टवेअर कंपनीमध्ये निवड झालेली आहे. नुकताच पुण्यात हा वॉक इन इंटरव्युव घेण्यात आला होता. कॉक्सिटमध्ये दर्जेदार शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना एमएनसी सॉफ्टवेअर कंपनीत संधी मिळावी यासाठी ट्रेनींग व प्लेसमेंटच्या माध्यमातून विशेष तयारी करून घेतली जाते. यामध्ये कंपनीच्या मुलाखतीसाठी सॉफ्ट स्किल, ॲप्टीट्युड टेस्ट व कम्युनिकेशन स्कील्स असे अत्यावश्यक इंटरव्युह टेक्नीक्स शिकविले जातात. यामुळे सर्वसाधारण विद्यार्थीसुध्दा त्याची मरगळ झटकून आत्मविश्वासाने मुलाखतीला सामोरे जावू शकतो.

सन २०१५ मध्ये विप्रो, इन्फोसिस, टी.सी.एस., टेक महिंद्रा, रिअल इमेजस प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मुलाखतीत कॉक्सिटच्या एकुण ३९ विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे.

ट्रेनींग ॲण्ड प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा.किशोर जेवे, प्रा.डी.एच.महामुनी, प्रा.कैलास जाधव, प्रा.सईदा फिरदोस, प्रा.किरण सुर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांच्या यशस्वीतेसाठी मेहनत घेतली. माजी प्राचार्य डॉ.एम.आर.पाटील, प्राचार्य डॉ.एन.एस.झुल्पे, उपप्राचार्य डॉ.बी.एल.गायकवाड, प्रा.एल.एम.पाटील, सर्व विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

सॉफ्टवेअर कंपनीमध्ये बीएस्सी सीएस , बीसीए, बीएस्सी एसई , बीएस्सी एनटी, तसेच पदव्युत्तर एमएस्सी सीएस, एमएस्सी एसई, एमएस्सी सॅन या विद्याशाखेतील विद्यार्थ्यांची वाढती मागणी आहे. यापुढील काळातही एमएनसी सॉफ्टवेअर कंपनी कॉक्सिटमध्ये कॅम्पससाठी येणार असून विद्यार्थ्यांनी यामध्ये यशस्वी होवून स्वतःच्या पायावर उभे रहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ.एन.एस.झुल्पे यांनी केले आहे.



माजी प्राचार्य डॉ.एम.आर.पाटील टीसीएस सॉफ्टवेअर कंपनीमध्ये यशस्वी झालेल्या प्रमोद पाटील या विद्यार्थ्याचा सत्कार करताना. यावेळी उपस्थित प्राचार्य डॉ.एन.एस.झुल्पे, प्रा.आय.एम.काझी, प्रा.किशोर जेवे.